जा. ब. विज्ञान महाविद्यालय
आवक क्र. 143
दिनांक 09/03/2012


# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

## महाविद्यालयीन शाखा

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१, दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२५२९९३२
फॅक्स नं. ०७१२–२५५५७०१, Email ID : ar-cs@nagpuruniversity.org


क्र.म.वि. 1234. C/1013
दिनांक 03/3 /२०१२.

प्रती,

प्राचार्य,
जानकीदेवी बजाज कॉलेज ऑफ सायंस,
जमनालाल बजाज मार्ग, सिव्हील लाईन,
वर्धा ४४२००१.

विषय :– बी.एस.सी. या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेचे पत्र मिळण्याबाबत.

संदर्भ :– आपले पत्र क्र. १७६३/२०११–१२ , दि. २६.१२.२०११

महोदय,

उपरोक्त संदर्भाकींत पत्राचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात सुरु असलेले बी.एस.सी. या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेबाबत सादर केलेल्या सहपत्रावरुन आपल्या महाविद्यालयात बी.एस.सी. अभ्याक्रमाच्या ४ तुकडया असुन या तुकडयांची एकुण प्रवेश क्षमता ४२० विद्यार्थ्यांची आहे. तेंव्हा आपण त्याप्रमाणे विद्यार्थी प्रवेशाची कार्यवाही करावी.

कळावे.

आपला

उपकुलसचिव (म.वि.)
रा.तु.म नागपूर विद्यापीठ,नागपूर

(1) University File
(2) Mam
(3) [illegible]

C:\BAJAPEYEE\LETTERS FILE.doc.

* **President**
Shri. Rahul Bajaj
* **Chairman**
Shri. Bharat Mahodaya
* **Vice-President**
Shri. Chandrashekhar Dharmadhikari
* **General Secretary**
Shri. Sanjay Bhargava

Registered under section XXI of Socities Registration Act 1860
& under section XXIX of Bombay Public Trust Act 1950

# Shiksha Mandal

Jamnalal Bajaj Marg, Civil Lines, Wardha - 442 001. (M.S)
**Phone/Fax : (07152) 230506, 230507**

**Ref.No.** SM/JBSC/SR/4641/523

**Dated** 13 MAR-2012

Date : 13/03/2012

To
The Principal,
Jankidevi Bajaj College of Science,
Wardha

Reference : - University letter No. क्रमवि 1239 C/1013 dated 03/03/2012

Subject : Intake capacity and number of sections for B.Sc. first year.

With reference to above subject and university letter number क्रमवि 1239 C/1013 dated 03/03/2012, it has been decided that looking into number of sanctioned teaching post and number of teachers appointed in the college, the sanctioned sections for B.Sc. first year should be considered as 3 and the intake for these sections should be 320.

SHIKSHA MANDAL WARDHA

**Sanjay Bhargava**
General Secretary
Shiksha Mandal, Wardha.

*General Secretary,*
*Shiksha Mandal, Wardha.*

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

## महाविद्यालय विकास विभाग

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१, दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२५२९९३२,२५२२३९०
फॅक्स नं. ०७१२–२५५५७०१, Email ID : infoarcollege@ymail.com


क्र. रातुमनावि / म.वि.वि. / प्रवेशक्षमतावाढ / ६६९ — दिनांक २७.१०.२०२१

प्रती,

प्राचार्य,
बजाज कॉलेज ऑफ सायंस,
वर्धा.

**विषय :– पदव्युतर पदवी अभ्यासक्रमात मंजुर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्तीच्या प्रवेशास मान्यता देण्याबाबत.**

संदर्भ :– आपले पत्र दि. १३.१०.२०२१.

महोदय,

आपले उपरोक्त संदर्भांकित पत्राचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपले महाविद्यालयातील खालील अभ्यासक्रमातील प्रवेश पुर्ण झाले असून बरेचशे विद्यार्थी प्रतिक्षा यादीत असल्याचे आपण कळविल्यानुसार तसेच कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचीत राहु नये याकरीता आपले महाविद्यालयातील खालील नमुद पदव्युतर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता रकाना क्रमांक ४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे वाढविण्यास मा. कुलगुरुंनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२ (७) अंतर्गत विद्या परिषदेच्या वतीने मंजूरी प्रदान केली आहे. त्यानुसार आपल्या महाविद्यालयातील खालील प्रमाणे नमुद अभ्यासक्रमातील मंजुर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्तीच्या प्रवेशास खालील अटींच्या अधिन राहुन फक्त २०२१–२२ करीता मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | मंजुर प्रवेश क्षमता | सत्र २०२१–२२ करीता प्रवेश क्षमता वाढ |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | एम.एस.सी वनस्पतीशास्त्र – भाग १ | २२ विद्यार्थी | ४ विद्यार्थी |
| २. | एम.एस.सी रसायनशास्त्र – भाग १ | २२ विद्यार्थी | ४ विद्यार्थी |
| ३. | एम.एस.सी सुक्ष्मजिवशास्त्र – भाग १ | २२ विद्यार्थी | ४ विद्यार्थी |
| ४. | एम.एस.सी प्राणीशास्त्र – भाग १ | २२ विद्यार्थी | ४ विद्यार्थी |
| ५. | एम.एस.सी गणित – भाग १ | २२ विद्यार्थी | ४ विद्यार्थी |

जास्तीच्या प्रवेशाकरीता करण्यात येणारी प्रवेश प्रक्रिया ही पारदर्शक पध्दतीने करण्यात येऊन कोणत्याही विद्यार्थ्यांकडुन विद्यापीठाद्वारे निर्धारित शुल्कापेक्षा जास्तीचे शुल्क आकारण्यात येऊ नये. उपरोक्त अटींचे पालन न झाल्यास अतिरीक्त प्रवेशाकरीता देण्यात आलेली मान्यता रदद करण्यात येईल. तसेच अतिरीक्त प्रवेश क्षमता ही केवळ सन २०२१–२२ पुरतीच मर्यादीत राहील व या पोटी शिक्षकांचा कार्यभार वाढल्यास कोणताही आर्थिक भार शासनावर येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

आपला

(डॉ.रमण मदने)
उपकुलसचिव

प्रतिलीपी,

१) मा.सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, जुने मॉरीस कॉलेज इमारत, नागपूर–४४०००१.
२) मा.संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, एल.आय.टी.परिसर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
३) विभागीय उपआयुक्त, समाजकल्याण, इमारत क्र. १, न्यु.प्रशासकीय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर–४४०००१.

जा. ब. विज्ञान महाविद्यालय
आवक क्र. 251
दिनांक 18/05/2012

# RASHTRASANT TUKADOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY

(Established by Government of Central Provinces Education Department by Notification No.513 dated the 1st August,1923 & presently a State University governed by Maharashtra Universities Act,1994)

No.BCUD/R/J/2012/ 968/0/172
Date: 15/05/2012

To,

The Principal,
Jankidevi Bajaj College of Science,
Jamnalal Bajaj Marg, Civil Line,
Wardha-442 001.

Reference: Your Application for Recognition.

With reference to above, this is to inform you that your application for Recognition as place for Higher Learning and Research has been processed, as per the provisions of Section 84(3) of the Maharashtra Universities Act, 1994 and Direction No. 7 of 2003.

A committee constituted by the Board of College and University Development has scrutinized the infrastructural facilities, academic, administrative and financial standards of your college.

The report, so submitted by the committee was considered and approved by the Board of College and University Development in its meeting held on 22nd June, 2011 vide item No. 1(A) and thereafter by the Academic Council in its meeting held on 23rd February, 2012 vide item No.80.

**Accordingly, Jankidevi Bajaj College of Science, Wardha has been granted Recognition as "Place for Higher Learning and Research" leading to Ph.D. degree in the "Departments of Chemistry and Botany" in the Faculty of Science with the maximum intake capacity of 10 registered students in each subject.**

**The "Recognition" so granted, shall be for a period of "Five Years" from the date of issuance of this communication.**

(Dr. A.D. Choudhary)
Registrar
Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur
University, Nagpur.

****

/Mohd Zahid/Certificate-1/08052012/

Imp-File
(2) आवक
(3) dm. file.

जा. क्र. 587
दि. 27/05/2019

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

''(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३दिनांक १ आगॅस्त, १९२३ द्वारा स्थापित, व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क. ६)द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)''

## महाविद्यालय विकास विभाग

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर,, रविन्द्र टागोर मार्ग, नागपूर–440001

क्रमांक.रातुमनावि/म.विवि./२०१९/5326.
दिनांक. २२/०५/२०१९

प्रति,

प्राचार्य,
जानकीदेवी बजाज कॉलेज ऑफ सायन्स,
जमनालाल बजाज मार्ग सिव्हील लाईन्स वर्धा–४४२००१

**BY SPEED POST**

विषय– उच्च अध्ययन व संशोधन केन्द्र म्हणुन नुतनीकरणासह पाच वर्षाकरिता मान्यता व नविन विद्यार्थ्यांची नोंदणी करण्याबाबत.

संदर्भ– १)आपला प्रस्ताव क्र. J.B.C./165/ २०१६.–२०१७ दिनांक १६/०५/२०१६
२) आमचे पत्र क्र. रातुमनावि/२०१८/ २२२१ दिनांक २६/०६/२०१८
३) आपल्या महाविद्यालयाचे दिनांक ०३/०७/२०१८ व १५/१२/२०१८ रोजीचे त्रृटी पुर्तता बाबत

महोदय,

आपले उपरोक्त विषयाचे संदर्भांकीत पत्राचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाने **Chemistry and Botany** या विभागाला नुतनीकरणासह उच्च अध्ययन व संशोधन केन्द्र म्हणुन मान्यता मिळण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावावर विद्यापीठाने परिनियम क्र. ६ ऑफ २०१५ अंतर्गत कार्यवाही करून तज्ञ गठीत केलेल्या तपासणी समितीने Chemistry and Botany या विभागाला भेट देवून अहवालात काही सुचना/त्रृटया सुचवून सादर केलेला अहवाल दिनांक २४/०५/२०१८ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या सभेत ठेवण्यात आला होता. त्यावर अधिष्ठाता मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आपल्या महाविद्यालयाला अटींची पुर्तता करण्याचे अटीवर फक्त ३ वर्षाकरिता नुतनीकरणासह उच्च अध्ययन व संशोधन केन्द्र म्हणुन मान्यता देण्यात आली होती. परंतु नविन विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यास निर्बंध घालण्यात आला होता. याबाबत आपणास दिनांक २६/०६/२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आले होते.

त्या अनुषंगाने आपल्या महविद्यालयाने दिनांक १५/१२/२०१८ रोजी त्रृटयांची पुर्तता केल्या बदद्ल दिलेले पत्रावर कार्यवाही करून अधिष्ठाता मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार तज्ञ समितीने परत आपल्या महाविद्यालयातील **Chemistry and Botany** या विभागास प्रत्यक्ष भेट देवुन सादर केलेला अहवाल दिनांक २२/०४/२०१९ रोजी संपन्न झालेल्या अधिष्ठाता मंडळाच्या सभेत ठेवण्यात आला. अहवालावर विचार विनिमय करून अधिष्ठाता मंडळाद्वारे उपरोक्त विभागांना पाच वर्षोकरिता सत्र २०१७–२०२२ पर्यंत नुतनीकरणासह मान्यता प्रदान केली आहे. त्यामुळे नवीन विद्यार्थी प्रवेशित न करण्याची अट याद्वारे निरस्त करण्यात येत आहे.

अधिष्ठाता मंडळाच्या निर्णयाला मा. कुलगुरूंनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम कलम १११ (७) अंतर्गत मान्यता प्रदान केली असल्यामुळे **Chemistry and Botany,** या विभागास नुतनीकरणासह प्रत्येकी १० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह नुतनीकरणासह उच्च अध्ययन संशोधन केन्द्र म्हणुन पाच वर्षोकरिता सत्र २०१७–२०२२ पर्यंत मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

आपला विनीत,

(डॉ. रमण मदने)
उपकुलसचिव (म.वि.वि)
(अति. कार्य.)

प्रतिलीपी–
१. उपकुलसचिव, आचार्य पदवी कक्ष, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर
२. मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, सेंट्रल बिल्डींग, पुणे –०१